Nagpur Municipal Corporation
जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर
E-News Letter
जून २०१७

# कचऱ्याचे विलगीकरण ही प्रत्येकाची जबाबदारी : आयुक्त अश्विन मुदगल



**मनपा व स्वयंसेवी संस्थांतर्फे जनजागृतीपर अभियानास सुरुवात**

कचरा निर्मितीच्या ठिकाणीच कचऱ्याचे विलगीकरण करुन ते स्वतंत्रपणे संकलित करणे ही हॉकर्स असो, गृहिणी असो , दुकानदार असो किंवा हॉटेलवाले असो, ओला व सुका कचरा असा कचऱ्याचे विलगीकरण करुनच तो मनपा यंत्रणेला देणे ही प्रत्येकाची जबाबदारीच आहे असे वक्तव्य मनपा आयुक्त अश्विन मुदगल यांनी केले.

मनपा व ग्रीन व्हिजीलतर्फे गुरुवार ता. १ जून रोजी आकाशवाणी चौक येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घनकचरा व्यवस्थापनाच्या जनजागृतीपर अभियानास सुरुवात झाली. याप्रसंगी अपर आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे , ग्रीन व्हिजीलचे संचालक कौस्तभ चॅटर्जी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना आयुक्त अश्विन मुदगल म्हणाले, प्रत्येक व्यक्ती हा कचऱ्याचा निर्माता असतो. त्यामुळे जेथून कचरा निर्माण होतो तेथूनच तो ओल्या व सुक्या स्वरुपात वेगवेगळा जमा करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. ओल्या कचऱ्यापासून खत निर्माण केले जाणार असून सुका कचरा हा डंपिंग यार्डमध्ये नष्ट करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. या पुढे आता अस्वच्छता निर्माण करणाऱ्यावर मनपा कठोर कारवाई करेल, असेही आयुक्तांनी सांगितले. यावेळी हॉकर्स लोकांनी जमा केलेला हिरव्या रंगाच्या डब्यात साठवलेला दिवसभराचा ओला कचरा हा दररोज सायंकाळीच उचलला जाईल तर निळा रंगाच्या डब्यातील सुका कचरा हा आठवड्यातून एक किंवा दोन दिवस उचलून नेण्यात येईल असे अपर आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे यांनी सांगितले.

याप्रसंगी मनपा व ग्रीन व्हिजीलतर्फे जनजागृतीपर फलकाद्वारे ओला व सुका कचरा कोणता आहे व तो कोणत्या रंगाच्या डब्यात साठवायचा याचे प्रात्यक्षिक करुन दाखवण्यात आले. कचरा विलगीकरण ही खूप मोठी जबाबदारी नसून आपल्या शहरासाठी व पर्यावरणासाठी प्रत्येकाने ही जवाबदारी उचलण्याचे आवाहन यावेळी आयुक्त अश्विन मुदगल यांनी केले. यावेळी आयुक्तांसह उपस्थित सर्व हॉकर्स व ग्रीन व्हीजीलच्या स्वयंसेवकांनी आपले शहर घाण करणार नाही, आज पासून ओला व सुका कचरा हिरव्या व निळ्या डब्यात वेगवेगळा जमा करणार, अशी शपथ घेतली.

# नाल्याच्या सफाईकामात दिरंगाई खपवून घेणार नाही : दीपराज पार्डीकर



कार्यकारी महापौरांनी केली नदी स्वच्छतेची पाहणी

नाले सफाई कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, कोणत्याही अधिकाऱ्यांनी कामात हलगर्जीपणा केला तर त्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी दिला.

नाले व नदी स्वच्छता अभियानाची त्यांनी शनिवारी (ता. ३ जून) पाहणी केली. यावेळी वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले, लकडगंज झोनचे सभापती दीपक वाडीभस्मे,प्रदीप पोहाणे, नगरसेविका जयश्री रारोकर, वैशाली रोहणकर, नगरसेवक राजकुमार सेलोकर उपस्थित होते.

नागपूर महानगरपालिकेद्वारे नाले व नदी स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्या पार्श्वभूमीवर महापालिका पदाधिकाऱ्यांचे पाहणी दौरे धडाक्यात सुरू आहे. शनिवारी सकाळी त्यांनी म्हाडा कॉलनी, भरतवाडा येथील नागनदीची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. गंगाबाग, शिवशंभो नगर येथील नाल्याची पाहणीही यावेळी केली.

नदीचे प्रवाह मोकळे करून त्याला वाहते करा, जेणेकरून पावसाचे पाणी ओसंडून वाहणार नाही व वस्तीत शिरणार नाही, नाल्याच्या सभोवताल असेलेले गाळाची त्वरित व्यवस्था करण्यात यावी, असे आदेश यावेळी पार्डीकर यांनी दिले. गंगाबाग पुलाजवळील नदीच्या मार्गात नासुप्रने अनधिकृत भिंत बांधलेली आहे, त्याला त्वरित तोडण्याचे आदेश यावेळी अधिकाऱ्यांना दिलेत.

पावसाळ्यात नदी, नाले भरून वाहू लागतात. त्याला संरक्षक भिंत नसल्यामुळे पाणी घरात शिरते, अशी तक्रार स्थानिक नागरिकांनी केली असता पावसाळ्यापूर्वी त्याचा बंदोबस्त करण्यात येईल, असे आश्वासन कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी दिले.नाल्याभोवती व नदी भोवतालच्या संरक्षक भिंतीची डागडुजी करून त्याला पक्के करा,असेही आदेश त्यांनी दिले. स्थानिक नागरिकांच्या समस्या यावेळी पार्डीकर यांनी जाणून घेतल्या. तेथील नागरिकांना त्रास होत आहे. या नाल्यांमध्ये जमा झालेला गाळ, कचरा मोकळा करून त्याला मोकळे करा, त्याचप्रमाणे नागरिकांना भविष्यात अडचण होऊ नये म्हणून त्याची तातडीने व्यवस्था करण्याचे आदेश कार्यकारी महापौर पार्डीकर यांनी दिले.नाल्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर

कठोर कारवाई करून अतिक्रमण त्वरित हटवावे असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही या तक्रारीकडे कानाडोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही पार्डीकर यांनी जाब विचारला. नागरिकांच्या सर्व समस्यांचे लवकरात लवकर निराकरण होईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

पावसाळ्यात नदी, नाले भरून वाहू लागतात. त्याला संरक्षक भिंत नसल्यामुळे पाणी घरात शिरते, अशी तक्रार स्थानिक नागरिकांनी केली असता पावसाळ्यापूर्वी त्याचा बंदोबस्त करण्यात येईल, असे आश्वासन कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी दिले.नाल्याभोवती व नदी भोवतालच्या संरक्षक भिंतीची डागडुजी करून त्याला पक्के करा,असेही आदेश त्यांनी दिले. स्थानिक नागरिकांच्या समस्या यावेळी पार्डीकर यांनी जाणून घेतल्या. तेथील नागरिकांना त्रास होत आहे. या नाल्यांमध्ये जमा झालेला गाळ, कचरा मोकळा करून त्याला मोकळे करा, त्याचप्रमाणे नागरिकांना भविष्यात अडचण होऊ नये म्हणून त्याची तातडीने व्यवस्था करण्याचे आदेश कार्यकारी महापौर पार्डीकर यांनी दिले.नाल्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून अतिक्रमण त्वरित हटवावे असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही या तक्रारीकडे कानाडोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही पार्डीकर यांनी जाब विचारला. नागरिकांच्या सर्व समस्यांचे लवकरात लवकर निराकरण होईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

नाल्यात व नागनदीत कोणीही कचरा टाकू नये. नदी-नाले स्वच्छ ठेवा, असे आवाहन त्यांनी यावेळी तेथील नागरिकांना केले. कचरा करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा सूचक इशारा त्यांनी यावेळी दिला. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाद्वारे तयार करण्यात आलेले पत्रक नागरिकांच्या घरी जाऊन दिले. स्वच्छतेबद्दलची जनजागृती केली.

या प्रसंगी लकडगंज झोनल अधिकारी प्रमोद आत्राम, निरीक्षक खोब्रागडे, बंडुभाऊ फेदेवार, रितेश राठे, उर्मिला चंदनबोंडे, मनीषा अतकरे, महेंद्र बागडे, चक्रधर अतकरे,हरिश्चंद्र बोंडे आदी उपस्थित होते.

# स्वच्छ भारत अभियानांतर्गत क्रांतीची मुहूर्तमेढ रोवू : महापौर



**ओला-सुका कचरा विलगीकरण प्रक्रियेला सुरुवात : निळ्या आणि हिरव्या कचरा डब्यांचे महापौरांच्या हस्ते वितरण**

आपला परिसर स्वच्छ ठेवणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. आपले घर जसे स्वच्छ ठेवतो त्याप्रमाणे आपला परिसरदेखिल स्वच्छ ठेवणे ही महानगरपालिकेसोबतच नागरिकांचीही जबाबदारी आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत ओला आणि सुका कचरा वेगळा करण्याचा संकल्प करीत नव्या क्रांतीची मुहूर्तमेढ रोवू, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिकेद्वारे ओला व सुका कचरा वर्गीकरण प्रक्रियेची सुरुवात सोमवारी (ता. ५ जून) करण्यात आली. यानिमित्त नागपूर महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या दहाही झोनमध्ये ओल्या कचऱ्यासाठी निळ्या आणि सुका कचऱ्यासाठी हिरव्या कचरापेटीचे वाटप करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवारी आणि लक्ष्मीनगर झोन येथील कार्यक्रमात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते कचरा डब्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. अन्य झोनमध्ये विविध मान्यवरांच्या हस्ते कचरा डब्यांचे वाटप करण्यात आले.

मंगळवारी झोन येथे आयोजित कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून स्थायी समिती सभापती संदीप जाधव, केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाचे अप्पर सचिव दीनदयाल, मंगळवारी झोन सभापती सुषमा चौधरी, दुर्बल घटक समितीचे सभापती महेंद्र धनविजय, नगरसेवक नरेंद्र वालदे, नगरसेविका रश्मी धुर्वे, स्नेहा निकोसे, साक्षी राऊत, महेंद्र धनविजय, संगीता गिऱ्हे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, आरोग्य अधिकारी प्रदीप दासरवार, झोनचे सहायक आयुक्त विजय हुमने आदी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात पुढे बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, पर्यावरण दिन हा एक क्रांती दिन म्हणून नागपूर महानगर पालिकेच्या इतिहासात स्मरणात राहणार आहे. या दिवसापासून आपल्या घरातील ओला व सुका कचरा वेगळा करण्याची मोहीम महापालिकेने हाती घेतली आहे. नागपूर शहराला स्मार्ट करण्याच्या दृष्टीकोनातून हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, असेही त्या म्हणाल्या. एकत्रित केलेल्या कचऱ्याचा वापर खतनिर्मिती, वीजनिर्मिती करण्यात येणार आहे.

आपण ठरविले तर कचऱ्याला संपत्तीमध्ये परावर्तित करू शकतो, असेही त्या म्हणाल्या.

स्थायी समिती सभापती संदीप जाधव म्हणाले, पंतप्रधानांच्या स्वच्छ भारत योजनेअंतर्गत ही मोहीम नागपूर शहरात राबविण्यात येत असून नागपूर शहराला स्मार्ट करण्यात मोलाची कामगिरी बजावणार आहे. स्वच्छता अभियान हे स्वत:च्या घरापासून राबविण्यात यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ओल्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून त्यापासून खतनिर्मिती करण्यात येणार आहे, असेही ते बोलताना म्हणाले.

यावेळी नागरिकांना ओला कचरा व सुका कचरा जमा करण्याच्या कचरापेट्या देण्यात आल्या. ज्यांना कचरापेट्या हव्या आहेत त्यांनी संबंधित झोनमध्ये संपर्क साधवा, असे आवाहन महापौरांनी केले. यावेळी अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर यांनी स्वच्छतेची व ओला व सुका कचरा विलगीकरणाची शपथ उपस्थितांना दिली. महापौरांच्या हस्ते पर्यावरण दिनानिमित्त मंगळवारी झोन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. आभार सहायक आयुक्त विजय हुमने यांनी मानले.

गांधीबाग झोनअंतर्गत गोळीबार चौक येथे आयोजित कार्यक्रमात मध्य नागपूरचे आमदार विकास कुंभारे, झोन सभापती सुमेधा देशपांडे, माजी महापौर प्रवीण दटके, नगरसेवक जुल्फेकार भुत्तो, नगरसेविका आशा उईके, सैय्यदा बेगम अन्सारी, जिशान मुमताज, सहायक आयुक्त अशोक पाटील, उपअभियंता रवींद्र बुंधाले, आरोग्य झोनल अधिकारी प्रदीप बांबोर्डे, स्वास्थ निरीक्षक सुनील तुर्के उपस्थित होते.

लकडगंज झोनअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतमाता उद्यान आणि लता मंगेशकर उद्यान सूर्यनगर येथे आयोजित कार्यक्रमात झोन सभापती दीपक वाडीभस्मे, गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती सभापती चेतना टांक, ज्येष्ठ नगरसेवक बाल्या बोरकर, प्रदीप पोहाणे, अनिल गेंडरे, नगरसेविका कांता रारोकर, जयश्री रारोकर, सहायक आयुक्त सुभाष जयदेव, प्रभारी उपअभियंता मंगेश गेडाम, आरोग्य झोनल अधिकारी प्रमोद आत्राम उपस्थित होते.

धरमपेठ झोनअंतर्गत आयोजित कार्यक्रमाला केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाचे अप्पर सचिव दीनदयाल, धरमपेठ झोन सभापती रूपा रॉय, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, नगरसेवक प्रमोद कौरती, परिणिता फुके, नगरसेविका उज्ज्वला शर्मा, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगांवकर, सहायक आयुक्त महेश धामेचा, महेश मोरोणे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, विभागीय अधिकारी रोहीदास राठोड, उपअभियंता संजय वाटपाडे, स्वयंसेवी संस्था ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे कौस्तव चॅटर्जी, अंबाझरी जलसंवर्धन समितीचे राम मुंजे, आय क्लीन नागपूर संस्थेचे स्वयंसेवक, ग्रीन अर्थ संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

सतरंजीपुरा झोनअंतर्गत बिनाकी ले-आऊट चौक येथे आयोजित कार्यक्रमात उपमहापौर दीपराज पार्डीकर यांच्या हस्ते कचरा पेट्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी झोन सभापती संजय चावरे, मेहंदीबाग कॉलनी अध्यक्ष मोहम्मद भाई, आरोग्य झोनल अधिकारी राजूरकर, स्वास्थ निरीक्षक डकाह, हातीबेड, रवी देलीकर उपस्थित होते. धंतोली झोनअंतर्गत आयोजित कार्यक्रमात झोन सभापती प्रमोद चिखले, नगरसेविका लता काटगाये, जयश्री वाडीभस्मे, शिला मोहोड, नगरसेवक विजय चुटेले उपस्थित होते.

नेहरू नगर झोनअंतर्गत आयोजित कार्यक्रमात झोन सभापती रेखा साकारे, विरोधी पक्ष नेता तानाजी वनवे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, नगरसेवक पिंटू झलके, धर्मपाल मेश्राम, दिव्या धुरडे, रिता मुळे, मनिषा कोठे, सहायक

आयुक्त राजेश कराडे उपस्थित होते.

लक्ष्मीनगर झोनअंतर्गत आयोजित कार्यक्रमात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते कचरा डब्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाचे अप्पर सचिव दीनदयाल, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, नगरसेविका वनिता दांडेकर, नगरसेवक लखन येरावार, डॉ. प्रदीप दासरवार, सहायक आयुक्त सुवर्णा दखने उपस्थित होते.

हनुमाननगर झोनअंतर्गत आयोजित कार्यक्रमात झोन सभापती भगवान मेंढे, नगरसेवक डॉ. रवींद्र भोयर, सतीश होले, राजेंद्र सोनकुसरे, लवकुमार बेहेते, अभय गोटेकर, नगरसेविका विद्या मडावी, लिला हाथीबेड, कल्पना कुंभलकर, रूपाली ठाकूर, मंगला खेकरे, माधुरी ठाकरे, उषा पायलट, सहायक आयुक्त राजू भिवगडे, उपअभियंता हेडाऊ, आरोग्य झोनल अधिकारी दिनेश कलोडे उपस्थित होते.

आसीनगर झोनअंतर्गत आयोजित कार्यक्रमात आमदार डॉ. मिलिंद माने यांच्या हस्ते कचरा डब्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी यावेळी बसपा पक्ष नेता मोहम्मद जमाल, केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाचे अप्पर सचिव दीनदयाल, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, नगरसेवक दिनेश यादव, परसराम मानवटकर, नगरसेविका मंगला लांजेवार, विरंका भिवगडे, स्नेहा निकोसे, सामाजिक कार्यकर्ते इब्राहीम खान, सहायक आयुक्त विजय हुमणे उपस्थित होते.

सर्वत्र घेतली गेली स्वच्छतेची शपथ स्वच्छता अभियानांतर्गत पर्यावरण दिनापासून सुरू झालेल्या ओला आणि सुका कचरा विलगीकरण प्रक्रियेचा हेतू लोकांपर्यंत पोचावा, यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. सोमवारी कचरा डब्यांचे वाटप करण्याच्या निमित्ताने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये महापौर नंदा जिचकार, आमदार डॉ. मिलिंद माने, आमदार विकास कुंभारे, विविध झोनचे सभापती, अधिकाऱ्यांनी विविध ठिकाणी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली.

# पावसाळ्यापूर्वी आपात्कालिन यंत्रणा सज्ज ठेवा : नंदा जिचकार



### नदी-नाले स्वच्छतेबद्दल आढावा बैठक

पावसाळ्यापूर्वी महानगरपालिकेची आपात्कालिन यंत्रणा सज्ज करा, आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्रीची व्यवस्था करा, पावसाळ्यात नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या. आपल्या कर्तव्यात कुठलीही हयगय करु नका, अशा सूचना महापौर नंदा जिचकार यांनी केल्या.

बुधवारी मनपा मुख्यालयात पावसाळ्यापूर्वीच्या नियोजनाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. याप्रसंगी उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्षनेते संदीप जोशी, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती सभापती संजय बंगाले, आरोग्य समिती सभापती मनोज चापले, ज्येष्ठ नगरसेवक नरेंद्र (बाल्या) बोरकर, अपर आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे, आर. झेड. सिद्दिकी, रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, मुख्य अभियंता उल्हास देबडवार, अधीक्षक अभियंता दीपक सोनटक्के, दिलीप जामगडे, प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके यांच्यासह सर्व झोनचे कार्यकारी अभियंता, सर्व झोनचे सहायक आयुक्त, आरोग्य झोनल अधिकारी (स्वच्छता), उपअभियंता, आणि अन्य अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

शहरातील नदी, नाल्यांच्या सफाईचा झोननिहाय आढावा महापौरांनी घेतला. शहरातील विविध ठिकाणी पावसाळी नाल्यांच्या स्वच्छतेचा झोननिहाय आढावा यावेळी आयुक्तांनी घेतला. नदी-नाले आणि पावसाळी नाल्यांचा सादर करण्यात आलेला अहवाल सहायक आयुक्तांनी प्रमाणित करावा, याची पाहणी विविध पदाधिकारी करणार असल्याचे सत्तापक्षनेते संदीप जोशी यांनी सांगितले. शहरातील सीमेंट रोडची उंची वाढली असल्याने नागरिकांच्या घरात पाणी जाईल याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे सीमेंट रस्त्याचे काम करणारे कंत्राटदार आणि मनपाच्या यंत्रणेने सज्ज राहावे, असे निर्देश यावेळी महापौरांनी दिले. अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या ओळखाव्या. पावसाळी नाल्यांच्या सफाईची टाईमलाईन संपलेली आहे. जी-जी कामे शिल्लक आहेत ती कामे पुढील सात दिवसांत पूर्ण करा. कामात दिरंगाई झाली तर संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही महापौर जिचकार यांनी दिला.

पावसाळ्यामुळे शहरात आपातकालीन स्थिती निर्माण झाल्यास झोननिहाय बचाव पथकांचे गठन आणि त्यांचे संपर्क क्रमांक नगरसेवकांना देण्यात यावे. पावसाळ्यात पथदिवे बंद पडल्यास पर्यायी व्यवस्था निर्माण करावी असे निर्देशही महापौर नंदा जिचकार यांनी दिले. आरोग्य विभागाने पावसाळ्यात साथीचे रोग पसरणार नाही, याची काळजी घ्यावी आणि आवश्यक औषध पुरवठा आणि लसींची व्यवस्था करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

# फ्लाय ॲशच्या पुनर्वापरासाठी मनपाचे सर्वतोपरी सहकार्य : डॉ. रामनाथ सोनवणे




फ्लाय ॲश पुनर्वापर प्रक्रियेवर कार्यशाळा

फ्लाय ॲशच्या पुनर्वापर प्रक्रियेसाठी नागपूर महानगरपालिका सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासन डॉ. रामनाथ सोनवणे यांनी दिले. महाजेम्स आणि नागपूर महानगरपालिकेच्या वतीने उद्‌योग भवनातील एमआयडीसीच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये फ्लाय ॲश पुनर्वापर प्रक्रिया या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

व्यासपीठावर महाजेम्सचे संचालक सुधीर पालीवाल, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभागीय अधिकारी राहुल वानखेडे, डीआयसीचे संयुक्त संचालक ए.पी.धर्माधिकारी, ऊर्जामंत्री यांचे तांत्रिकी सल्लागार शेखर अमीन आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना सोनवणे म्हणाले, नागपूर महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या सर्व सीमेंट रस्त्यांच्या कामात यानंतर फ्लाय ॲशचा वापर करण्यात येईल. मनपाच्या नगररचना विभागाद्‌वारा शहरातील कोणत्याही बांधकामाला मंजुरी देताना फ्लाय ॲशचा वापर हा बंधनकारक असेल. सन ९१-९२ च्या काळात 'पॉवर कट'चा सामना करावा लागला होता. त्यानंतर ऊर्जानिर्मितीच्या दृष्टिकोनातून कार्य करताना धोरणात्मक निर्णय शासनाला घ्यावे लागले. ऊर्जानिर्मितीवर कार्य करणाऱ्या संस्था पुढे आल्या होत्या. कोळशापासून ऊर्जानिर्मिती करताना त्यातून ४० टक्के फ्लाय ॲश तयार होते. २००५ मध्ये या ॲशचा वापर करण्यात यावा, असा शासनाने विचार केला होता. त्यावर अंमलबजावणी करत सन २००७-०८ मध्ये महाराष्ट्र सरकारने बांधकामासाठी फ्लॉय ॲशचा वापर बंधनकारक केला. या फ्लाय ॲशपासून ऊर्जानिर्मितीसोबतच वाळू तयार करण्याचेही धोरण शासनाने आखले असून यामुळे नद्यांमधून वाळूचा उपसा कमी होईल आणि वाळुचे दर कमी होतील. वाळूच्या दरापाठोपाठ बांधकामाचे जे दर वाढले आहे, तेसुद्धा कमी होतील. फ्लाय ॲश पुनर्वापर प्रक्रियेत नागपूर शहर हे देशातील प्रथम क्रमांकावर आहे, असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

यावेळी बोलताना प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभागीय अधिकारी राहुल वानखेडे म्हणाले, मागील दोन वर्षांपासून फ्लाय ॲश संदर्भातील तक्रारी सातत्याने येत होत्या. आता फ्लाय ॲश पुनर्वापरासाठी जणू स्पर्धाच लागली आहे. या ॲशपासून विटा बनविण्यात येत असून हायवेवरील सीमेंटच्या रस्त्यांसाठीही ॲशचा वापर करता येतो. यापुढेही फ्लाय ॲशपासून विविध वस्तू तयार करण्यासाठी तसेच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने लागेल ती मदत करण्यासाठी तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

डीआयसीचे संयुक्त संचालक ए.पी. धर्माधिकारी यांनी केंद्र शासनाच्या योजनेअतंर्गत फ्लाय ॲशच्या पुनर्वापरासाठी काय सखोल प्रयत्न करता येईल याचा विचार सुरू असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे विदर्भ आणि मराठवाडा येथील उद्योगधंद्यांना चालना मिळावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्रात वर्षाकाठी ८० लाख टन फ्लाय ॲश तयार होत आहे. या कार्यशाळेतून ॲशच्या पुनर्वापराबद्दल त्यापुढे जाऊन विचार केला जाईल, असेही ते म्हणाले.

नागपूर महानगरपालिका आणि महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस लिमिटेड यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार आता या दोन्ही संस्था फ्लाय ॲश वापरासंदर्भात सोबत काम करणार आहे. त्याच्या प्रसारासाठी सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत 'महाराष्ट्र स्टेट ॲश पॉलिसी' याविषयावर सुधीर पालीवाल, 'प्रॅक्टीकल ॲप्लीकेशन ऑफ युटीलॉझेन्स ऑफ फ्लाय ॲश इन रोड कन्सट्रक्शन ॲण्ड सॉईल स्टॅबीलॉयझेशन' या विषयावर ए.एम सिंगारे, 'यूज ऑफ जियोसिंथेटिक क्ले लायनर्स इन लायनिंग ॲप्लिकेशन्स इन सिव्हील कन्स्ट्रक्शन' या विषयावर अमित बारटक्के यांचे व्याखाने झालीत.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक महाजेम्सचे संचालक सुधीर पालीवाल यांनी केले. संचालन व आभारप्रदर्शन मिलिंद रहाटगावकर यांनी केले.

कार्यक्रमाला नागपूर महानगरपालिकेचे अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, दिलीप जामगडे, कार्यकारी अभियंता प्रशांत देशपांडे, नगररचना विभागाचे अधिकारी, महाजेम्स आणि महाजनकोचे अधिकारी उपस्थित होते.

# दहावीच्या निकालात मनपा शाळेचे विद्यार्थी चमकले



## तन्वी मोटघरे सर्वप्रथम : महापौरांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने १२ जून रोजी दहावीचा निकाल ऑनलाईन घोषित झाला. बॅरिस्टर शेषराव वानखेडे विद्यानिकेतनची विद्यार्थिनी तन्वी भीमराव मोटघरे ही ९६.२० टक्के गुण प्राप्त करून मनपा शाळांमधून प्रथम आली आहे. हिंदी माध्यमातून संजयनगर हिंदी माध्यमिक शाळेचा विद्यार्थी भूपेंद्र शाहू हा ९४.८० टक्के गुण घेऊन तर उर्दू माध्यमातून सानिया परवीन अब्दुल कादीर ही साने गुरुजी उर्दू माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी ८८.४० टक्के गुण घेऊन अव्वल आली आहे.

महानगरपालिकेअंतर्गत मराठी, हिंदी, उर्दू माध्यमातील २८ शाळांमधून २०७४ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यापैकी १३९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ही टक्केवारी ६७.३६ इतकी आहे. मराठी माध्यमातून जयताळा माध्यमिक शाळेचा रुतिक ढोंगडे (९२ टक्के) याने द्वितीय तर बॅ. शेषराव वानखेडे विद्यानिकेतनची कु. मोनिका नेवारे (९०.८०) आणि जयताळा माध्यमिक शाळेचा आशीष येडे (९०.८०) यांनी संयुक्तपणे तिसरा क्रमांक पटकाविला. हिंदी माध्यमातून विवेकानंदनगर हिंदी माध्यमिक शाळेची रोशनी शुक्ला (८७.४०) आणि लाल बहादूर शास्त्री हिंदी माध्यमिक शाळेची जान्हवी सोनकुसरे (८५.४०) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. उर्दू माध्यमातून साने गुरुजी उर्दू माध्यमिक शाळेचा हुसेन शेख सलीम खान (८७.८०) आणि एम.ए.के. आझाद उर्दू माध्यमिक शाळेचा मो. रशीद मो. गुलाम मुस्तफा (८४.६०) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. दिव्यांग विद्यार्थ्यांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक शाळेची प्रिती पांडुरंग ब्राह्मणकर (७७.८०) हिने मनपा शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविला. मराठी माध्यमाचा निकाला ७१.०६ टक्के, हिंदी माध्यमाचा निकाल ५८.३१ टक्के तर उर्दू माध्यमाचा निकाल ८७.४४ टक्के लागला. कुंदनलाल गुप्तानगर उर्दू माध्यमिक शाळेचा निकाल १०० टक्के निकाल लागला. शाळेचे मुख्याध्यापक मो. शकील अख्तर व राजेंद्र पुसेकर यांचा यावेळी महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याखालोखाल बॅ. वानखेडे मराठी माध्यमिक शाळेचा निकाल ९६ टक्के लागला.

**गुणवंतांचा महापौरांच्या हस्ते सत्कार**

मनपाच्या शाळांमधून गुणवंत ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात झालेल्या कार्यक्रमात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा सभापती नागेश सहारे, आरोग्य सभापती मनोज चापले, महिला व बालकल्याण सभापती वर्षा ठाकरे, बसपा गटनेते मोहम्मद जमाल, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेविका दिव्या धुरडे, राकाँ नगरसेवक दुनेश्वर पेठे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, कार्यकारी शिक्षणाधिकी मिना गुप्ता उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना महापौर नंदा जिचकार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. ‘कॉन्व्हेंट कल्चर’च्या भाऊगर्दीत मनपाच्या शाळांनी संपादन केलेले यश नक्कीच वाखाणण्याजोगे आहे, असे म्हणत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत केलेली ही प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे. पालक, मुख्याध्यापक, शिक्षक यांनी परिश्रम घेऊन यश संपादन केल्याबद्दल त्यांचेही महापौर नंदा जिचकार यांनी कौतुक करून अभिनंदन केले. शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यकारी शिक्षणाधिकारी मीना गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक सुधीर कोरमकर यांनी संचालन केले.

# हजारो साधकांनी केली एकसाथ 'योगसाधना'



**आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मनपाचे आयोजन : चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी वेधले लक्ष, स्वच्छतेची घेतली शपथ**

'करू या नियमित योगासन....' अशा मंगलध्वनीच्या स्वरात हजारो योगसाधकांनी एक साथ योगासन करीत सुदृढ आणि निरोगी आरोग्यासाठी नियमित योगासन करण्याचा संदेश दिला. नागपूर महानगरपालिकाच्या वतीने शहरातील विविध योगाभ्यास मंडळाच्या सहकार्याने बुधवारी (ता.२१) येथील यशवंत स्टेडियमवर विश्व योग दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, विशेष अतिथी म्हणून ऊर्जामंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार होत्या. मंचावर खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे,आमदार गिरीश व्यास, आमदार सुधाकर देशमुख, आ. विकास कुंभारे, कार्यक्रमाचे संयोजक उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, विभागीय आयुक्त अनुपकुमार, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, नागपूर सुधार प्रन्यास सभापती डॉ. दिपक म्हैसेकर, माजी महापौर प्रवीण दटके, माजी सत्तापक्षनेते दयाशंकर तिवारी, सहसंयोजक व क्रीडा समिती सभापती नागेश सहारे,सहसंयोजक व शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे, स्थापत्य समिती सभापती संजय बंगाले, धरमपेठ झोन सभापती रूपा रॉय, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, प्रभागाचे नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेविका उज्वला शर्मा, जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे रामभाऊ खांडवे, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, माजी स्थायी समिती अध्यक्ष सुधीर राऊत, नगरसेविका पल्लवी शामकुळे, सीमा कढू, प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या रजनी दिदी, एनसीसीचे ग्रुप कमांडर राणा, उपायुक्त रविंद्र देवतळे, जयंत दांडेगावकर, डॉ. रंजना लाडे यांचेसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार माजी सत्तापक्षनेते दयाशंकर तिवारी यांनी केले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून योग दिन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सर्वप्रथम ना. नितीन गडकरी आणि ना. चंद्रशेखर बावनकुळे यांचा शाल,श्रीफळ, तुळशीचे रोपटे व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रारंभी योगवंदना झाली.यानंतर

जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाच्या चमूने आंतरराष्ट्रीय योगा दिनासाठी ठरवून देण्यात आलेल्या प्रोटोकॉलनुसार योगासनांची प्रात्यक्षिके केली. मंचावर असलेली युवक-युवतींची चमू आणि मंचासमोर असलेला हजारोंचा जनसमुदाय एकामागून एक योगासने करीत होता. प्रार्थनेनंतर शिथिलीकरण अभ्यास आणि त्यानंतर योगासने झाली. उभ्या आसनांमध्ये ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन आणि बसलेल्या आसनांमध्ये भद्रासन, वज्रासन/वीरासन, अर्ध उष्ट्रासन, उष्ट्रासन, उत्तानमंडूकासन,मरीच्यासन/वक्रासन, पोटाच्या आधारावर केल्या जाणारी आसने मकरासन, भुजंगासन,शलभासन, प्राणायाम आदींचे प्रात्यक्षिक करण्यात आले. त्यानंतर ध्यान, संकल्प आणि शांतीपाठ योगसाधकांनी केला.

**गल्लोगल्ली योगाचा प्रसार करा : गडकरी**

योग ही साधना आहे. समाजस्वास्थ सुदृढ ठेवण्यासाठी योग उपयुक्त आहे. या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन वर्षभर आपल्या वॉर्डात, मोहल्ल्यात, घरोघरी योगाचा प्रसार करा. यामुळे सामान्य लोकांचे स्वास्थ चांगले राहील. ही आता एक चळवळ बनली असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

**योगसाधकांनी घेतली स्वच्छतेची शपथ**

योग दिनाच्या निमित्ताने यशवंत स्टेडियम येथे एकत्रित येणाऱ्या नागपूरकरांसमोर 'स्वच्छ भारत अभियाना'मधील उपक्रमाची माहिती देण्यात आली. ओला आणि सुका कचरा वर्गीकृत करूनच मनपाच्या स्वच्छता यंत्रणेकडे सोपविण्यात यावा, यासाठी मनपाने जनजागृती सुरू केली. याचाच एक भाग म्हणून नागरिकांना यासंदर्भातील 'स्वच्छतेची शपथ' केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी योगसाधकांना दिली.

**चित्तथरारक प्रात्यक्षिके**

विश्व योग दिनाच्या आयोजनात जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळ, आर्ट ऑफ लिव्हिंग, मैत्री परिवार संस्था, क्रीडा भारती, भारतीय वायुसेना (एनसीसी), रामचंद्र मिशन, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, नागपूर जिल्हा योग असोशिएशन, नागपूर जिल्हा क्रीडा असोसिएशन, गायत्री परिवार, इशा फाऊंडेशन, सहजयोग ध्यान केंद्र, यांच्यासह विविध संस्थांचा सहभाग होता. जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाच्या चमूने योग दिनानिमित्त करावयाची योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली. नागपूर जिल्हा योग असोशिएशन,युनीटी स्पोर्टस्च्या बालकांनी चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यानंतर आर्ट ऑफ लिवींग, सहजयोग ध्यान केंद्र आदींच्या पदाधिकाऱ्यांनी योग, ध्यान आदींची प्रात्यक्षिके सादर केली.

**पांढऱ्या रंगाने व्यापले स्टेडियम**

विश्व योग दिनाच्या निमित्ताने स्टेडियममध्ये एकत्रित होणाऱ्या साधकांना धवल वस्त्र परिधान करून येण्याचे आवाहन नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात आले होते. त्यानुसार हजारोंच्या संख्येत धवल वस्त्र परिधान करून आलेल्या साधकांमुळे स्टेडियम पांढऱ्या रंगाने व्यापले होते. पांढऱ्या परिधानावर भगव्या रंगाचा दुपट्टा यामुळे वेगळीच शोभा स्टेडियमला आली होती.

# नागपूर ठरणार इंडो.फ्रेंच द्विसंबंधाचा 'प्लॅटफॉर्म' : पॉल अर्मलीन




फ्रेंच व्यवसाय प्रतिनिधी मंडळाची स्मार्ट सिटी-मेट्रो रेल प्रकल्पांना भेट

नागपुरातील स्मार्ट सिटी आणि नागपूर मेट्रो प्रकल्पात फ्रान्समधील विविध कंपन्यांची गुंतवणूक आहे. भविष्यात इंडो-फ्रेंच द्विसंबंध अधिक दृढ होण्यासाठी नागपूर प्लॅटफॉर्म ठरेल, असे प्रतिपादन फ्रान्स सरकारच्या द्विपक्षीय आर्थिक संबंधाचे विशेष प्रतिनिधी पॉल अर्मलीन यांनी केले.

नागपूर स्मार्ट सिटी आणि मेट्रो प्रकल्पात गुंतवणुकीच्या दृष्टीने माहिती घेण्यासाठी नागपुरात आलेल्या फ्रेंच व्यवसाय प्रतिनिधी मंडळाने नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पाची माहिती जाणून घेतल्यानंतर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. याप्रसंगी महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, साऊथ एशिया रिजनल इकॉनॉमिक डिपार्टमेंटचे प्रमुख जॉन मार्क फेनेट, फ्रेंच डेव्हलपमेंट एजन्सीचे डेप्युटी डायरेक्टर हर्व डुब्रेल, मनपाचे अतिरिक्त आयुक्त आणि स्मार्ट सिटी प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे चर्चासत्रात सहभागी झाले होते.

स्मार्ट सिटी आणि नागपूर रेल प्रकल्पात फ्रान्सच्या सहभागाची माहिती देताना पॉल अर्मलीन पुढे म्हणाले, नागपूर हे जागतिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. इंडो-फ्रेंच संबंधाचे नागपूर एक उदाहरण आहे. भविष्यात जगातील इतर शहरे नागपूरपासून प्रेरणा घेतील. नागपुरात इलेक्ट्रीक वाहतुकीसाठी फ्रान्सने ३.५ मिलियन युरो अर्थसहाय्य केले होते. नागपूरच्या विकासासाठी फ्रान्सचे सहकार्य यापुढेही सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जॉन मार्क फेनेट यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून नागपूर स्मार्ट सिटी आणि नागपूर मेट्रो विकासात फ्रान्स सरकार आणि फ्रेंच कंपनीचे काय योगदान आहे, याबाबत माहिती दिली. स्मार्ट सिटी प्रकल्पात काम करणाऱ्या ६९ कंपनींनी फ्रेंच स्मार्ट सिटी क्लबचे सदस्यत्व स्वीकारले असून नागरी वाहतूक, ऊर्जास्त्रोत बळकटीकरण, सांडपाणी व्यवस्थापन, माहिती आणि संवाद, घरबांधणी नियोजन आणि पर्यटन या विविध क्षेत्रात सदर कंपनी कार्यरत असल्याची माहिती दिली.

फ्रेंच डेव्हलपमेंट एजंसीचे उपसंचालक हर्व डुब्रेल यांनी स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी सहायक असलेल्या विविध नव्या उपकरणांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

महापौर नंदा जिचकार यांनी, नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पात योगदान देणाऱ्या फ्रान्स सरकार आणि फ्रान्स कंपन्यांचे आभार मानले. नागपूर स्मार्ट आणि सुरक्षित बनविण्यास आम्ही कटीबद्ध आहोत. फ्रान्समधील तंत्रज्ञान आणि अर्थसहाय्याच्या जोरावर पॅरीससारखे शहर होण्यास नागपूर कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास त्यांन व्यक्त केला.

मनपा आयुक्त अश्विन मुदगल म्हणाले, कुठल्याही प्रकल्पासाठी तांत्रिक मदत आवश्यक असते. कारण अशा मदतीने विचारांचे आदानप्रदान होते. फ्रान्स सरकारने नागपूरला अशी मदत केल्याबद्दल नागपूरच्या वतीने आम्ही आभारी आहोत, असेही ते म्हणाले.

फ्रेंच प्रतिनिधी मंडळात सहभागी असलेल्या फ्रान्समधील टॉप कंपन्यांच्या प्रमुखांनी त्यांच्या कार्याबाबत सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली.

तत्पूर्वी महापौर नंदा जिचकार यांनी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने पॉल अर्मलीन यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर फ्रेंच शिष्टमंडळाच्या वतीने हर्व डुब्रेल यांनी महापौर नंदा जिचकार यांचे स्वागत केले. स्मार्ट सिटी प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे यांनी स्मार्ट सिटी प्रकल्पाची संपूर्ण माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून दिली. त्यानंतर स्मार्ट सिटी प्रकल्पात कार्यरत असलेल्या एन.जे.एस. इंजिनिअर्स प्रा.लि.च्या सोनाली कतरे यांनी नाग नदी पुनर्जीविकरण प्रकल्पाची, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर यांनी नाग नदी विकास प्रकल्पाची तर अहमदाबाद येथील एचसीपी डिझाईन, प्लानिंग ॲण्ड मॅनेजमेंट प्रा.लि. चे प्रकल्प व्यवस्थापक गणेश अहिरे यांनी क्षेत्राधिष्ठीत विकास प्रकल्पाची माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून दिली. फ्रेंच शिष्टमंडळाच्या वतीने पॉल अर्मलीन यांनी तर नागपूर महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या वतीने अपर आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे यांनी आभार मानले.

**नागपुरातील विविध प्रकल्पांना भेट**

फ्रान्स सरकारच्या द्विपक्षीय आर्थिक संबंधाचे विशेष प्रतिनिधी पॉल अर्मलीन यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांना भेट दिली. ३० सदस्यीय प्रतिनिधीमंडळांनी तीन गटात तीन विविध प्रकल्पांची पाहणी केली. एका चमून स्मार्ट सिटी उपक्रमाच्या क्षेत्राधिष्ठीत विकास प्रकल्पांतर्गत कार्य सुरू असलेल्या पारडी-भरतवाडा-पुनापूर येथील कार्याची पाहणी केली. पारडीतील भवानी मंदिराला भेट दिल्यानंतर क्षेत्राधिष्ठीत विकास कार्याची माहिती जाणून घेतली. दुसऱ्या चमूतील सदस्यांनी नाग नदी विकास प्रकल्पाला भेट दिली. नाग नदीचा उगम असलेल्या अंबाझरी तलाव ते वर्धमान नगर येथील सेंट झेविअर्सपर्यंतच्या नाग नदीचा दौरा करीत विकास कार्याची माहिती घेतली. तिसऱ्या चमूने नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या कार्याची माहिती घेतली. मेट्रो हाऊस येथे प्रारंभी नागपूर मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. सादरीकरणाच्या माध्यमातून मेट्रोच्या प्रगतीकार्याची माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक बृजेश दीक्षित यांनी दिली. यावेळी महामेट्रोचे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम, महामेट्रोचे महाव्यवस्थापक (प्रशासन) अनिलकुमार कोकाटे उपस्थित होते. त्यानंतर शिष्टमंडळाने सेंट्रल मॉल येथील आणि एअरपोर्ट साऊथ मेट्रो स्थानकाची तसेच साई मंदिर येथील वायाडक्टची पाहणी केली.

फ्रेंच व्यवसाय प्रतिनिधी मंडळात टॅक्टबिल इंजिनिअरिंग प्रा.लि.चे व्यवसाय विकास प्रमुख ए. एस. भसीन, बिजनेस फ्रान्सचे जेरोम जुलियंड, फ्रेंच डेव्हलपमेंट एजंसीचे ॲन्टोनी बुज, फ्रान्स दूतावासाचे रूज क्लेमेंट, कौन्सिलर जनरल

ऑफ फ्रान्स जॉन मार्क मिगनॉन, फ्रान्स दूतावासाचे अमित ओझा, ॲकॉर हॉटेलचे उपाध्यक्ष श्वेतांक सिंग, ॲकॉर हॉटेलचे उपमुख्य महाव्यवस्थापक मनोज अग्रवाल, अल्टोस्टेपचे डेमियन कॅरियर, वेस्ट इगिसचे विभागीय संचालक सिद्धार्थ देब, वेवोलिया इंडियाचे प्रकल्प प्रमुख नीरज नारंग, व्यवस्थापक धीरज कोचे, हर्व डुब्रेल, उमेश जाधव, रुषित पडालिया, गिरीश पिल्लई, विनोद जोशी, डेविड मॉस्रेकोविज, अशोक काटे, रणवीर साही, जितेन गुलराजानी, फ्रान्स दूतावासाच्या कौन्सीलर इलिका खन्ना-मान आदी प्रतिनिधींचा समावेश होता. सदर चमूसोबत मनपाच्या वतीने कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर, नद्या-सरोवरे प्रकल्प प्रमुख मो. इसराईल, सहायक आयुक्त सुभाषचंद्र जयदेव होते.

# पावसाने नुकसान झालेल्या भागाची महापौरांनी केली पाहणी



## नुकसानग्रस्त भागाला तातडीने मदत देण्याचे निर्देश

नागपुरात मंगळवार २७ जून रोजी सकाळपासून कोसळलेल्या संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. अनेक सखल भागात पाणी शिरले. झाडे उन्मळून पडली. काही घरे कोसळली. या नुकसानग्रस्त भागाला महापौर नंदा जिचकार यांनी भेट देऊन तातडीने मदतकार्य करण्याचे आदेश दिले. नागपूर शहरातील मुसळधार पावसाचा अंदाज लक्षात घेता नागपूर महानगरपालिकेच्या यंत्रणेला सज्ज राहण्याचे निर्देश यापूर्वीच महापौर नंदा जिचकार यांनी दिले होते. त्यानुसार यंत्रणा सज्ज होती. सोमवार २६ जूनपासून सुरू झालेल्या पावसाचा जोर मंगळवारी वाढला. यामुळे शहरातील अनेक सखल भागात पाणी साचले. वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला. नरेंद्रनगर येथील पुलाखाली साचलेल्या पाण्यात कार फसली. झोपडपट्टी भागातील नागरिकांची तारांबळ उडाली. या सर्व परिस्थितीचा आढावा महापौर सकाळपासून घेत होत्या. सकाळी सर्व झोन सभापती आणि सर्व आयुक्तांशी दूरध्वनीवर संपर्क साधून आपआपल्या झोनमधील परिस्थितीवर लक्ष ठेवण्यास त्यांनी सांगितले. मनपातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने सर्व झोनमधील माहिती त्यांनी मागविली. जेथे मदतीची गरज आहे तेथे तातडीने मदत पोहचविण्याचे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले होते.

दुपारी त्यांनी नुकसानग्रस्त भागाची आणि पाणी साचलेल्या भागाची पाहणी केली. नरेंद्र नगर पुलालाही भेट दिली. तेथे साचलेल्या पाण्यात बुडालेल्या कारला तातडीने काढण्याचे निर्देश त्यांनी दिले. भविष्यात पुलाखाली पाणी साचू नये यासाठी काय उपाययोजना करता येईल, यासंदर्भात त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी त्यांच्यासोबत नगरसेविका जयश्री वाडीभस्मे, अतिरिक्त आयुक्त आर.झेड. सिद्दीकी, कार्यकारी अभियंता (स्लम) डी.डी. जांभुळकर, लक्ष्मीनगर झोनच्या सहायक आयुक्त सुवर्णा दखने, झोनचे आरोग्य अधिकारी बोकारे, अभियंता रवींद्र मुळे होते. पुढील काही दिवस नागपुरात मुसळधार पावसाची शक्यता असल्याने यंत्रणा २४ तास सज्ज ठेवण्याचे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी दिले. नागरिकांनीही जिथे मदत लागेल तेथे मदत पोहोचविण्यास मनपा सज्ज आहे. आपल्या भागातील झोन सभापती, नगरसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांनी परिस्थिती माहिती द्यावी आणि जी तातडीची मदत हवी असेल ती मागावी, असे आवाहन महापौर जिचकार यांनी यावेळी केले.

# नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवा : महापौर



महापौर, उपमहापौर, आयुक्त यांनी सतरंजीपुरा व लकडगंज झोनचा केला संयुक्त दौरा, नुकसानग्रस्त भागाचे निर

पावसाच्या पाण्यामुळे नागपुरातील अनेक भाग प्रभावित झाले असून नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे. यासंदर्भात अधिकाऱ्यांनी दक्षता घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवा, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

मंगळवार २७ जून रोजी झालेल्या मुसळधार पावसाने शहरातील अनेक वस्त्या जलमय झाल्या. अनेक ठिकाणी नुकसान झाले. सतरंजीपुरा झोनअंतर्गत झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अश्विन मुदगल, स्थायी समितीचे माजी सभापती प्रवीण भिसीकर यांनी सतरंजीपुरा झोन भागात संयुक्त दौरा करून तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांच्यासमवेत सतरंजीपुरा झोन सभापती संजय चावरे, नगरसेवक महेश महाजन, नगरसेविका दुर्गा हत्तीठेले, माजी नगरसेवक विलास पराते, गुणवंत झाडे, मुख्य अभियंता विजय बनगीरवार, अधीक्षक अभियंता दीपक सोनटक्के, कार्यकारी अभियंता राजेश भूतकर, झोनचे सहायक आयुक्त प्रकाश वराडे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी दहीबाजार उड्डाणपुलासमोरील रस्ता उंच झाल्याने पावसाचे पाणी सरळ उतारभागाने परिसरातील वस्त्यांमध्ये शिरल्याने नागरिकांची गैरसोय झाल्याचे प्रभागाचे नगरसेवक व उपमहापौर दीपराज पार्डीकर, ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण भिसीकर यांनी महापौर व आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या भागात बऱ्याच ठिकाणी चेंबर फुटले व चेंबरवर कव्हर नाहीत. ते त्वरित दुरुस्त करून कव्हर लावण्याचे निर्देश महापौर व आयुक्तांनी दिले. पावसाचे पाणी कुणाच्या घरात जाणार नाही त्यादृष्टीने पाईपलाईन टाका व पाणी अडणार नाही त्यादृष्टीने त्वरित उपाययोजना करा, असे निर्देश दिले.

झाडे चौक लालगंज शेजारी मनपाच्या बस्तरवारी माध्यमिक शाळेत मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने विद्यार्थांची गैरसोय झाल्याने तेथील चेंबर त्वरित स्वच्छ करा व पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्याचे निर्देश यावेळी महापौर व आयुक्तांनी दिले. तसेच या परिसरातील आर.डी.पी. अंतर्गत बांधण्यात आलेल्या नाल्यातील गाळ त्वरित काढण्याचे निर्देश दिलेत. या परिसरात कचऱ्याचे ढीग व साफसफाई नियमित करून परिसर स्वच्छ करून औषध फवारणी करा, असेही निर्देशित केले.

**लकडगंज झोनमध्ये घेतली आयुक्तांनी आढावा बैठक**

यानंतर आयुक्त अश्विन मुदगल व उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी लकडगंज झोनअंतर्गत येणाऱ्या प्रभागातील नगरसेवकांची व झोनअंतर्गत येणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलाविली. यावेळी आयुक्तांनी संबंधित सर्व प्रभागातील नगरसेवकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी लकडगंज झोनचे सभापती दीपक वाडीभस्मे, स्थायी समितीचे माजी सभापती व ज्येष्ठ नगरसेवक नरेंद्र (बाल्या) बोरकर, प्रदीप पोहाणे, अनिल गेंडरे, शेषराव गोतमारे, राजकुमार साहू, नगरसेविका सरीता कावरे, मनिषा अतकरे, जयश्री रारोकर, निरंजना पाटील, मुख्य अभियंता विजय बनगीरवार, अधीक्षक अभियंता दीपक सोनटक्के, कार्यकारी अभियंता सी.जी. धकाते, कार्यकारी अभियंता राजेश भूतकर, सहायक आयुक्त सुभाष जयदेव तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मा. निगम आयुक्तांनी पाणी साचण्याचे नेमके कारण त्यांनी जाणून घेतले. पहिल्याच पावसात जर या वस्त्यांमध्ये पाणी शिरले असेल तर भविष्यात अशी परिस्थिती उद्‌भवणार नाही यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. पावसाचे पाणी नाल्यामध्ये सोडण्याची व्यवस्था सदोष असेल तर ती तातडीने दुरुस्त करा. गडर लाईन स्वच्छ करा, असे निर्देशही त्यांनी दिले. पाण्याचा निचरा करण्यासाठी तातडीने उपाययोजना करा असे निर्देश त्यांनी झोनच्या अधिकाऱ्यांना दिले. लकडगंज झोनमध्ये गडर लाईन लहान असल्याने मोठ्या आकाराची गडर लाईन टाकण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. नागरिकांना कुठलाही त्रास होणार नाही याची विशेष दखल घेण्यात यावी, अशी सूचना यावेळी आयुक्तांनी केली.

दौऱ्याप्रसंगी परिसरातील नागरिकांच्याही त्यांनी भेटी घेतल्या. त्यांच्याशी संवाद साधत समस्या जाणून घेतल्या. महानगरपालिका आपल्या समस्या सोडविण्यासाठी आणि येणाऱ्या आपत्तीचा सामना करण्यासाठी सदैव तत्पर आहे याबाबत महापौर आणि आयुक्तांनी नागरिकांना आश्वस्त केले.